दैनिक लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

## अजित पवारांच्या सुरक्षा रक्षक आणि फ्लाइट अटेंडंट पिंकी यांच्यावर अंत्यसंस्कार

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातील बारामती येथे बुधवारी विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाले. अजित पवार यांच्यासोबत त्यांचे सुरक्षा कर्मचारी, दोन वैमानिक आणि एक महिला क्रू सदस्य अशा एकूण ५ जणांचा मृत्यू झाला. अजित पवार यांच्यावर आज बारामती येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. तर विमानातील सह-वैमानिक कॅप्टन शांभवी पाठक यांच्यावर दिल्लीत आणि क्रू सदस्य पिंकी माळी यांच्यावर मुंबईतील ठाण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. विमानाचे वैमानिक सुमित कपूर यांच्यावर आज दिल्लीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. यापूर्वी त्यांचे खासगी सुरक्षा अधिकारी विदिप दिलीप जाधव यांच्यावर बुधवारी रात्री त्यांच्या मूळ गावी अंत्यसंस्कार झाले होते.

(वर्ष ६५ वे अंक ४१) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.३० जानेवारी २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

# अजित दादा अनंतात विलीन; शोकाकुल वातावरणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती, हजारोंचा जनसागर उसळला

बारामती दि.२९ (प्रतिनिधी)- 'एकच वादा, अजित दादा,' 'अमर रहे, अमर रहे, अजित दादा अमर रहे,' 'परत या, परत या, अजित दादा परत या' दादा, दादा असा हंबरडा फोडत हजारोंच्या साश्रू नयनांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अखेरचा निरोप दिला. गुरुवारी दुपारी बाराच्या सुमारास विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात अजित दादांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. पार्थ आणि जय पवार यांनी चितेला मुखाग्नी दिला. तेव्हा उपस्थित असलेल्या हजारो समर्थकांचे आणि कार्यकर्त्यांचे डोळे पाणावले होते. पत्नी सुनेत्रा पवार यांनी पतीच्या पार्थिवावर गंगाजल अर्पण करून अंतिम निरोप दिला. महाराष्ट्र पोलिस दलातर्फे हवेत फैरी झाडून आणि बिगुल वाजवून अजित पवारांना अखेरची मानवंदना देण्यात आली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यासह केंद्रीय मंत्री, राज्यमंत्री, राज्य सरकारमधील मंत्री, खासदार, आमदार आणि राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी अजित दादांना श्रद्धांजली अर्पण केली. असा मनमिळाऊ, दिलखुलास, दिलदार नेता परत होणार नाही. अशा अवेळी अजित दादांसारखा उमदा नेता गमावल्याने धक्का बसल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. याशिवाय विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, प्रताप जाधव, रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलमताई गोऱ्हे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री छगन भुजबळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, मंत्री हसन मुश्रीफ, आंध्र प्रदेशचे शिक्षण मंत्री नारा लोकेश, खासदार निरजजी चंद्रशेखर, मंत्री गणेश नाईक, बाबासाहेब पाटील, मकरंद पाटील, दत्तात्रय भरणे, पंकजा मुंडे, गिरीश महाजन, मंगल प्रभात लोढा, संजय राठोड, कु. आदिती तटकरे, शंभूराज देसाई, जयकुमार गोरे, शिवेंद्रराजे भोसले, प्रा. डॉ. अशोक उईके, नरहरी झिरवाळ तसेच राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मेघना बोर्डीकर, आकाश फुंडकर उपस्थित होते. प्रशासनाच्या वतीने राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल (पान ४ वर)




### अजित पवार यांचा निपचित पडलेला देह आणि त्याकडे एकटक पाहणारे शरद पवार, महाराष्ट्राच्या काळजाला चटका लावणारे चित्र

महाराष्ट्राचे भविष्यातील नेतृत्व म्हणून ज्यांच्याकडे आशेने पाहिले जात होते त्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी बारामती येथे अपघाती निधन झाले होते. अजित पवार हे बुधवारी जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी बारामती येथे येणार होते. त्यांचे विमान बारामती विमानतळावर उतरत असताना बाजूच्या शेतात कोसळले होते. यावेळी विमानाचा प्रचंड मोठा स्फोट होऊन अजित पवार यांच्यासह सहा जणांचा जागीच मृत्यू झाला होता. अजित पवार यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्राला मोठा धक्का बसला होता. अजित पवार यांच्यावर आज बारामतीच्या विद्या प्रतिष्ठान येथे अंत्यसंस्कार केले जात आहेत. अजित पवार यांचे पार्थिव आज सकाळी काहीवेळ त्यांच्या काटेवाडी येथील निवासस्थानी आणण्यात आले होते. त्यानंतर काटेवाडी ते विद्या प्रतिष्ठान त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली. ही अंत्ययात्रा विद्या प्रतिष्ठान येथे आली तेव्हा याठिकाणी हजारोंचा जनसमुदाय जमला होता. अजित पवार यांचे पार्थिव विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात उभारण्यात आलेल्या चौथऱ्यावर आणण्यात आले त्यावेळी याठिकाणी शोकाकुल वातावरण होते. अजित पवार यांच्या पार्थिवावसह पवार कुटुंबातील सर्वजण याठिकाणी आले. पोलिसांनी अजित पवार यांचे पार्थिव अंत्यविधीसाठी खाली ठेवले. त्याच्या अगदी समोर शरद पवार हे बसलेले होते. ते एकटक अजित पवार यांच्या पार्थिवाकडे बघत होते. अजित पवार यांचा निपचित पडलेला देह आणि त्याकडे एकटक पाहणारे शरद पवार, हे चित्र महाराष्ट्राच्या काळजाला चटका लावणारे ठरले.

## अजित पवारांच्या विमान अपघाताची चौकशी सुरू

### विमान अपघात तपास ब्यूरोने घेतली जबाबदारी, देवेंद्र फडणवीसांच्या पत्राची केंद्राकडून दखल

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बुधवारी विमान अपघातात दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. मुंबईहून बारामतीच्या विमानतळावर लँड करत असतानाच त्यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला. या अपघातात अजित पवारांसह विमानातील सर्वांचाच मृत्यू झाला आहे. आता हा अपघात नेमका कशामुळे झाला, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार आता याची चौकशी एएआयबी या संस्थेने सुरू केली असल्याची माहिती समोर आली आहे.

विमान अपघात तपास ब्यूरो या संस्थेने अपघाताची चौकशी सुरू केली असून त्याचा अहवाल आल्यानंतर तो राज्य सरकारलाही पाठवण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताची चौकशी करावी असे पत्र केंद्रीय उड्डाण मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांना लिहिले होते. त्या पार्श्वभूमीवर या अपघाताची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या पत्रावर प्रतिक्रिया देताना मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांनी म्हटले की, विमान अपघात ब्यूरो या संस्थेने तपास सुरू केला आहे. विमानातील ब्लॅकबॉक्स ताब्यात घेण्यात आला आहे. विमान अपघात आणि घटना नियमांनुसार, तपास सुरू केला आहे. तो पारदर्शी आणि कालबद्ध पद्धतीने होईल.

तसेच पुढे बोलताना किंजरापु राममोहन नायडू म्हणाले, या अपघातातील सर्व टेक्निकल रेकॉर्ड्स, ऑपरेशनल तपशील, घटनास्थळावरील तथ्य याचा तपास केला जात आहे. भविष्यात अशा घटना होऊ नयेत, या आपल्या विनंतीची मंत्रालयाने दखल घेतली असून, चौकशी अहवाल येताच त्यादृष्टीने उपाययोजना करण्यात येतील. या चौकशीत महाराष्ट्र सरकारचेही सहकार्य आम्हाला मौल्यवान असेल. स्थानिक प्रशासनाची यात मदत लागेल. हा संपूर्ण चौकशी अहवाल राज्य सरकारलाही आम्ही देऊ, अशी माहिती नायडू यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाठवलेल्या पत्रात असे म्हटले की, अजित पवार (पान ४ वर)

## सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्री करा; मंत्री नरहरी झिरवाळ यांची मागणी

### राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळांनी घेतली सुनेत्रा पवारांची भेट

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- अजित पवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होत असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकारणात मोठी खळबळ उडवणारे वक्तव्य समोर आले आहे. राष्ट्रवादीचे नेते नरहरी झिरवाळ यांनी थेट सुनेत्रा पवार यांना राज्याचे उपमुख्यमंत्रीपद देण्याची मागणी करत अजित पवार यांच्या पश्चात निर्माण झालेल्या नेतृत्वाच्या प्रश्नावर स्पष्ट भूमिका मांडली आहे. झिरवाळ यांच्या या विधानानंतर राज्याच्या राजकारणात आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नव्या हालचालींना वेग येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांनी सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्याचे समोर आले आहे. मात्र, ही भेट नेमकी कशाबद्दल होती, याची माहिती अजून पुढे आली नाही.

अजित पवार यांच्या पार्थिवाला त्यांचे पुत्र पार्थ पवार आणि जय पवार यांनी मुखाग्नी दिला. चिता पेटताना उपस्थितांची मने सुन्न झाली होती. अंत्यसंस्काराच्या संपूर्ण विधी दरम्यान पार्थ पवार आणि जय पवार हेच प्रमुखपणे समोर उभे राहून सर्व मान्यवरांच्या भेटी घेत होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि पवार कुटुंबातील इतर सदस्य खाली बसून होते. त्यामुळे अनेकांच्या नजरा पार्थ आणि जय पवार यांच्यावर खिळल्या होत्या. अजित पवार यांचे राजकीय वारसदार म्हणून हे दोघे पुढे येणार, असे संकेत यातून मिळाल्याची चर्चा सुरू झाली.

अजित पवार हे केवळ राज्याचे उपमुख्यमंत्री नव्हते, तर ते अर्थमंत्री, बारामती विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा होते. त्यांच्या अचानक जाण्यामुळे एकाच वेळी अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या रिक्त झाल्या आहेत. त्यामुळे या जागा कोण भरणार, पक्षाची धुरा कोण सांभाळणार आणि सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका काय असेल, असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर अजित पवारांच्या अंत्यसंस्कारानंतर लगेचच नरहरी झिरवळ यांनी केलेल्या वक्तव्याने या चर्चांना अधिकच धार दिली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नरहरी झिरवाळ यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट शब्दांत सांगितले की, अजित पवार यांच्यानंतर सुनेत्रा पवार यांना राज्याचे उपमुख्यमंत्रीपद देण्यात यावे. झिरवाळ यांच्या या मागणीने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. अजित पवार यांच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी पक्षाने तातडीने निर्णय घ्यावा, असा संकेत या विधानातून देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, अंत्यसंस्काराच्या दिवशीच अशी मागणी समोर आल्यामुळे तिचे राजकीय महत्त्व अधिक वाढले आहे.

## मोदी-फडणवीसांनी अजित पवारांवरील आरोप मागे घ्यावे; संजय राऊत यांचा भाजपवर थेट हल्ला

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघातातील निधनानंतर देशभरातून शोक व्यक्त केला जात असतानाच, भाजपकडून देण्यात आलेल्या पानभर श्रद्धांजली जाहिरातींवरून नवा राजकीय वाद उफाळून आला आहे. उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार टीका करत, जाहिराती देणे ही श्रद्धांजली नाही, तर अजित पवारांवर लावलेले ७० हजार कोटींचे आरोप मागे घेणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असा थेट हल्लाबोल केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही राऊत यांनी यावेळी स्पष्ट सल्ला दिला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात शोककळा पसरली असली, तरी त्याचवेळी आरोप-प्रत्यारोपांचाही नवा अध्याय सुरू झाला आहे. भारतीय जनता पक्षाने अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी विविध वर्तमानपत्रांमध्ये पानभर जाहिराती प्रसिद्ध केल्या. या जाहिरातींमधून अजित पवार यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. मात्र, या जाहिरातींवरूनच आता राजकीय टीकेची धार अधिक तीव्र होताना दिसत आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी या जाहिरातींवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत भाजपच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला आहे.

संजय राऊत यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत भाजपवर जोरदार टीका केली. भाजपने कमाल केली आहे. दादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी पानभर जाहिराती (पान ४ वर)

## जिल्हा परिषद- पंचायत समिती निवडणुकीचे मतदान आणि निकाल पुढे ढकलला, तारखेत बदल

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या तारखेमध्ये राज्य निवडणूक आयोगाने बदल केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात जाहीर करण्यात आलेल्या तीन दिवसांच्या दुखवट्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ५ फेब्रुवारी रोजी होणारे मतदान आता ७ फेब्रुवारी रोजी होणार असून आहे. तर मतमोजणीची तारीखही बदलून ९ फेब्रुवारी करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुकांसाठी १३ जानेवारी २०२६ रोजी सविस्तर निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्या कार्यक्रमानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, निवडणूक चिन्ह वाटप तसेच अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल ी आहे. मात्र मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे अद्याप शिल्लक होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी अपघाती निधन झाल्यानंतर राज्य शासनाने २८ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला. या कालावधीत कोणतेही सार्वजनिक कार्यक्रम न घेण्याचे निर्देश असल्याने निवडणूक प्रक्रियेतील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्याची गरज निर्माण झाली.

## यूजीसीच्या नव्या वादग्रस्त नियमावलीला सर्वोच्च न्यायालयाची तात्पुरती स्थगिती

नवी दिल्ली दि.२९ (वृत्तसंस्था)- २०१९ मध्ये रोहित वेमुला आणि पायल तडवी यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मातांनी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करून, विद्यापीठांमधील जातीनिहाय भेदभाव रोखण्यासाठी ठोस यंत्रणा उभारण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर यूजीसीने २०२६ ची नवी नियमावली अधिसूचित केली होती, ज्यामुळे २०१२ ची नियमावली रद्द झाली. मात्र, नव्या नियमांमुळे सामान्य प्रवर्गावर अन्याय होतो, असा दावा करत काही गटांनी विरोध दर्शवला आहे. तर दुसरीकडे, आरक्षित प्रवर्गातील संघटना नियम मागे घेण्यास विरोध करत आहेत.

आता याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने महत्वपूर्ण निर्णय दिला. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर या नियमावलीच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या तीन याचिकांवर सुनावणी झाली.

सुनावणीदरम्यान खंडपीठाने काही मुद्द्यांवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. नियमावलीतील काही तरतुदी अस्पष्ट असून त्यांचा गैरवापर होऊ शकतो. 'भेदभाव' ही संकल्पना आधीच परिभाषित असताना, 'जातीनिहाय भेदभाव' स्वतंत्रपणे परिभाषित करण्याची गरज काय? नियमावलीतून रॅगिंगचा उल्लेख का वगळण्यात आला आहे?, असे अनेक प्रश्न न्यायालयाने उपस्थित केले. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना उद्देशून सांगितले की, "या नियमावलीचा पुन्हा विचार करण्यासाठी विशेष समिती स्थापन केली पाहिजे.

समाजातील मूल्ये, सामाजिक आजार आणि या नियमांचा कॅम्पसबाहेरील वर्तनावर होणारा परिणाम याचा सखोल विचार होणे आवश्यक आहे." सरन्यायाधीशांनी यावेळी व्यापक सामाजिक प्रश्नही उपस्थित केला. "अनुसूचित जातींमधील अनेकजण आता आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले आहेत. आपण जातिरहित समाजाकडे वाटचाल करत असताना, पुन्हा मागे जात आहोत का?" असा सवाल त्यांनी केला. तसेच, वेगवेगळ्या जातींसाठी स्वतंत्र वसतिगृहांची कल्पनाही त्यांनी तीव्र शब्दांत फेटाळली. "कृपया हे करू नका! आम्ही सगळे एकत्र राहत होतो. आंतरजातीय विवाहही होत आहेत," असे त्यांनी नमूद केले.

न्यायमूर्ती बागची यांनीही शिक्षण संस्थांमध्ये भारतीय एकतेचे प्रतिबिंब दिसले पाहिजे, असे मत व्यक्त केले. २०१२ च्या नियमावलीत सर्वसमावेशक संरक्षण होते. मग आता त्यातून मागे जाणे का, असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी मागासलेपणाकडे न जाण्याचा सिद्धांत अधोरेखित केला. न्यायालयाने युजीसी नियमावली, २०२६ अंमलबजावणीपासून तात्पुरती स्थगित ठेवण्याचे आदेश दिले. न्यायालयाने केंद्र सरकार आणि यूजीसीला नोटीस बजावली असून, पुढील सुनावणी १९ मार्च रोजी ठेवण्यात आली आहे. तोपर्यंत २०२६ चे नियम लागू राहणार नाहीत, तसेच २०१२ मधील यूजीसी नियमावली पुन्हा लागू राहील, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

## १२ डिसेंबरला दोन राष्ट्रवादी एकत्र येण्याचं गिफ्ट पवारसाहेबांना देण्याचं अजित पवारांच्या मनात होतं, अंकुश काकडे यांनी सांगितली अजित पवार यांच्यासोबत झालेली चर्चा

मुंबई दि.२९ (प्रतिनिधी)- राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी (दि. २८) विमान दुर्घटनेत दुर्दैवी निधन झालंय. एकीकडे पवार कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळलेला असताना, दुसरीकडे येणाऱ्या दिवसांत हेच पवार कुटुंब महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी असणार आहे. अजित पवारांच्या जाण्याने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला नेतृत्वाची मोठी पोकळी निर्माण झाली आहे. पुढील काळात अजित पवार गटाची दिशा, निर्णयप्रक्रिया आणि राजकीय रणनिती काय असेल? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यातील सर्वात महत्त्वाचा आणि चर्चेचा मुद्दा म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट पुन्हा एकत्र येणार का? या शक्यतेवर आता राष्ट्रवादीतील नेते भाष्य करीत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलिनीकरणाबाबत महत्त्वाचं भाष्य केलं आहे. 'आता सत्य बोलणं गरजेचं आहे. महापालिका निवडणुकीनंतर एकत्र येऊ, असं अजित पवार म्हणाले होते. त्या अनुषंगाने बैठकाही झाल्या. अजितदादा हे शरद पवारांकडे पाहूनच हे बोलत होते. आता त्यादृष्टीनंच आमची वाटचाल होईल,' असं सूचक विधान शशिकांत शिंदे यांनी केलंय. दरम्यान, अजित पवार यांनीही यापूर्वी एका जाहीर सभेत, 'आम्ही एकत्र आलो की काही लोकांच्या पोटात दुखायला का लागतं?' असा सवाल उपस्थित करत एकत्र येण्याच्या चर्चांना अप्रत्यक्ष दुजोरा दिला होता.

## सोन्याच्या दरात विक्रमी वाढ, १ तोळ्यासाठी १ लाख ८२ हजार

जळगाव दि.२९ (प्रतिनिधी)- गेल्या काही दिवसांता सोन्याच्या दरात मोठी वाढ झाली असून दीड लाखाचा टप्पा केव्हाच ओलंडला आहे. मात्र, दीड लखांवर गेलेलं सोनं आता कमी होईल, नंतर कमी होईल अशी अपेक्षा बाळगून असलेल्या ग्राहकांना सोन्याच्या दराने आणखी एक धक्का दिलाय. कारण, सोन्याच्या दरात एकाच दिवसांत तब्बल १४ हजार रुपयांची वाढ झाली आहे. जळगावच्या बाजारात सोने-चांदीमध्ये विक्रमी भाव वाढ झाली असून सोन्याचे दर हे १ लाख ८२ हजारांवर पोहोचले आहेत. तर चांदी प्रति किलो ४ लाख रुपयांवर विक्री केली जात आहे.

सोन्याच्या भावात होणाऱ्या ऐतिहासिक भाव वाढीमागे प्रामुख्याने जागतिक अस्थिरता, मध्यवर्ती बँकांकडून मोठी खरेदी, महागाई, आणि डॉलरच्या तुलनेत कमकुवत झालेला भारतीय (पान ४ वर)

# भारतीयांचे भूषण, महात्मा गांधी

सत्याग्रह या कल्पनेची शतकपूर्ती नुकतीच झाली. महात्मा गांधींच्या विचारांचा संपूर्ण जगावर प्रभाव असावा हे सत्य आहे. सर्व जगात अहिंसा आणि सत्याग्रह ही हत्यारे घेवून प्रस्थापितांशी संघर्ष सुरू आहे. सत्याग्रहासारखे प्रभावी अस्त्र आणि अहिंसा पालन ही गांधीजींची जगाला देणगी आहे. व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या इंग्रजांनी भारतातील तत्कालीन गोंधळ पाहून फोडा-झोडा नितीने देशावर हुकूमत प्रस्थापित केली. रेल आणि मेल या सोयी आणि जेलची दहशत या रेल-मेल-जेल त्रिसुत्रीने सत्ता बळकट केली. काही लोकांना त्यांनी उपकृत करून ठेवले असल्याने इंग्रजांचे राज्य कसे चांगले आहे ह्याचा ते प्रसार करीत असत. इंग्रजी सत्तेवरील सूर्य कधीच मावळत नाही ह्या इंग्रजांच्या दर्पोक्तीला काही तथाकथित सुधारणा वाद्यांचा पूर्ण पाठिंबा होता. हे राज्य ईश्वराने निर्माण केले आहे. इतक्या टोकाची भूमिका काही लोक घेत होते. या विचारधारेपुढे स्वातंत्र्यप्रेमी विचाराची गळचेपी होत होती. बलाढ्य इंग्रज कधीही देश सोडणार नाहीत, अशी त्या काळात धारणा होती.

क्षिण आफ्रिकेमधील आपले कार्य संपवून देश बांधवांसाठी गांधीजी भारतात परतले. बॅरिस्टर असलेल्या या नेत्याने मनात आणले असते तर त्या काळात खोऱ्याने पैसे कमविले असते. स्वातंत्र्याच्या विचारापायी आणि त्यासाठी काहीही करण्याची तयारी ठेवणाऱ्या गांधींच्या रूपाने देशाला खरा नेता खऱ्या अर्थाने राष्टपिता होता.

सामान्य माणसाला कोणत्या हाल अपेष्ठा सहन कराव्या लागतात. याची माहिती घेण्यासाठी गांधींजींनी देशभर प्रवास केला. देशातील दारिद्र्याचा अनुभव घेतल्यावर त्यांनी फक्त पंचा हे आपले वस्त्र निश्चित केले. नंगा फकीर या नावाने त्यांना हिणविले गेले तरी त्यांनी जे ठरविले होते. त्यात ते कधीही ब दल करत नसत. व्हाइसरायची भेट त्यांनी त्याच पोषाखात घेतली होती. इंग्रजांविरूध्द लढा देण्यासाठी त्यांनी सत्याग्रह हे नवीन हत्यार शोधले. अहिंसात्मक मार्गाने विरोध करणे या अस्त्राचा यशस्वी उपयोग गांधीजींनी केला. 'विचाराला विरोध म्हणजे हिंसा, हिंसेचे प्रत्युत्तर अहिंसा' या त्यांच्या आगळ्या तत्वज्ञानामुळे इंग्रज हतबल ठरले. सत्याग्रहींना कसे आवरायचे हा त्यांच्यापुढे प्रश्न पडला. दांडी येथील मीठाचा सत्याग्रह, बेचाळीस सालातील चलेजाव आंदोलन आणि स्वातंत्र्याची चाहूल लागल्यानंतर झालेला हिंसाचार रोखण्यासाठी नौरदालीमध्ये गांधींचे वास्तव्य या गांधीजींच्या जीवनातील आणि देशाच्या इतिहासातील प्रमुख घटना आहेत. मीठासारख्या कमी किंमतीच्या पण जीवनावश्यक वस्तूंसाठी त्यांनी केलेली दांडी यात्रा ही आंदोलनाच्या इतिहासामधील सन्मानाचा मापदंड आहे. चले जावच्या निमित्ताने संपूर्ण देशात झालेला उठाव आणि इंग्रजी राज्याविरोधी जन आंदोलनाम ुळे स्वातंत्र्य नजरेच्या टप्प्यात आले. चलेजाव हा जगाच्या इतिहासातील सर्वात मोठा, यशस्वी आणि शांततापूर्ण लढा आहे. शांततेच्या मार्गाने प्रश्न सोडविता येतात. मृत्यूचे तांडव न करता क्रांती होवू शकते. हे गांधीजींनी जगाला दाखवून दिले.

इंग्रज जाताना फाळणीची विव्देषाची ठिणगी टाकूनच गेले. त्यावेळी उसळलेल्या हिंसेला आवर घालण्यासाठी कोणतेही संरक्षण न घेता हा संत खवळलेल्या लोकांना एकटा सामोरा गेला होता. आयुष्यभर अहिंसेचा जप करणाऱ्या या महान नेत्याचा शेवट हिंसेने व्हावा ही देशासाठी अत्यंत खेदाची बाब होती. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसचे विसर्जन करून सर्वांनी देशहितासाठी झटावे हा त्यांचा विचार पुढे चालून मागे पडला. काँग्रेसने सत्ता संपादनातच जादा रस घेतला. गांधीजी आपल्यामध्ये नसले तरी त्यांचे विचार, आचार, आणि मार्गदर्शन आजही उपयुक्त आहेत. महायुध्दाच्या तोंडावर असलेल्या जगाला आज अहिंसा, सत्याग्रह, उपोषण हे विचार महत्त्वाचे वाटतात. हा गांधीजींच्या विचारांचा विजय आहे. माणसाला मारून त्याचे विचार नष्ट करता येत नाहीत. त्याचे गांधीजी हे उत्तम उदाहरण आहे. सामान्यांमधील हा असामान्य नेता आपल्या देशात जन्म ाला यावा हे भारतीयांचे भूषण आहे. ३० जानेवारी - महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना भावपूर्ण आदरांजली!

# महात्मा गांधी आणि अहिंसा

सत्याग्रह आणि अहिंसा ही गांधीजींची जगाला देणगी आहे. ब्रिटीश सत्तेविरुद्ध लढताना ह्या दोन शस्त्रामुळे लढा केवळ ऐतिहासिकच नव्हे तर तो सर्वव्यापी, सर्व समावेशक असा ठरला. जुलूमी इंग्रजांविरुद्ध लढाई सोपी नव्हती. मेल, रेल आणि जेल ह्या माध्यमातून इंग्रजांनी आपली सत्ता बळकट केली होती. ह्या जेलची दहशत संपविण्याचे ऐतिहासिक कार्य गांधीजींनी केले. जेलमध्ये सत्याग्रहींना ठेवण्यास जागा नाही अशी स्थिती निर्माण करण्याचे कार्य अहिंसा आणि सत्याग्रहामुळेच साध्य झाले. गांधीजींनी अहिंसेबद्दल विपुल लिखाण केले आहे. हरिजन सेवक ह्या त्यांच्या वृत्तपत्राद्वारे त्यांनी अगदी सोप्या शब्दात अहिंसेबाबत लिहिले आहे, ते लिहितात-

श्र अहिंसा एक व्यापक संकल्पना आहे. आम्ही पामर प्राणीम ात्र हिंसेच्या आगीत अडकलो आहे. 'जिवो जिवस्य जीवनम्' हे असत्य नाही. मनुष्य प्रत्येक क्षणी कोणत्यान् कोणत्या प्रकारे हिंसा करतच असतो. हिंसेपासून सुटण्याचा लहानसा प्रयत्नही त्याला अहिंसेचे पुजारीपण देऊ शकतो, मात्र ह्या प्रयत्नाची गरज सातत्याने असते.

सत्य आणि अहिंसा मार्ग गायीच्या दुधाप्रमाणे असते. योग्य अनुपातात त्याचे सेवन केल्याने शरीराचे पोषण होते. तसेच अहिंसेचे योग्य प्रकारे पालन केल्यास आत्म्याचे पोषण होते. अहिंसेच्या विकासासाठी आम्ही आपल्या जीवनात सत्य, नम्रता, सहिष्णुता, प्रेम आणि करूणा हे गुण जोपासले पाहिजे. प्रामाणिकपणा ही श्रेष्ठ व्यवहारनीती आहे इंग्रज मानतात. परंतु अहिंसेच्या पार्श्वभूमीवर विचार केल्यास ती एक निती नसून तो अविचल असा सिद्धांत आहे. अहिंसेचे कार्य हे हिंसेसोबत राहूनच करावे लागणार आहे. त्यामुळे माझी अशी मागणी आहे की, कायद्यामध्ये अहिंसक विरोधासाठी स्वतंत्रपणे तरतूद असावी. अहिंसेचे हिंसेसोबतच करावे लागणार असल्याने अशी गरज तीव्रतेने जाणवते. खऱ्या अहिंसेमध्ये इतकी शक्ती असते, की भीषण हिंसा ही त्या समोर टिकू शकणार नाही.

अहिंसेचा आरंभ आणि शेवट आत्मनिरीक्षणातूनच होत असतो. अहिंसेची बाराखडी कुटुंबात राहूनच शिकता येते. जर आपण तेथे यश मिळविले तर सर्वत्र यशाचा मार्ग मोकळाच असतो. मी हे स्वत:च्या अनुभवातून सांगतो आहे, अहिंसक व्यक्तीसाठी सारे जग हे स्वत:च्या कुटुंबाप्रमाणे आहे. अहिंसेची साधना करणारा साधक स्वबळावर मैदानात उतरत नाही ईश्वरीय बळाच्या पाठिंब्यावर तो हे धाडस करत असतो.

# अजितदादांची अकाली एक्झिट

**सकाळी** सव्वा नऊ वाजता शिवसेनेचे माजी आमदार शिशिर शिंदे यांचा मला फोन आला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सहा जणांचा सकाळी पावणे नऊच्या सुमारास बारामती येथे विमान अपघातात मृत्यू झाल्याचे त्यांनी मला सांगितले. मला धक्का बसलाच पण या घटनेने सारा महाराष्ट्र हळहळला. आदल्या दिवशी मुंबईत झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीला अजितदादा उपस्थित होते. बुधवारी सकाळी ते एका छोट्या खाजगी विमानाने बारामतीला निघाले, जिल्हा परिषद निवडणुकीसाठी बारामतीत त्यांच्या तीन प्रचारसभा होत्या. बारामती विमानतळावर विम ान उतरत असताना धावपट्टीवरून घसरले नि मोठा स्फोट होऊन विमानाने पेट घेतला. वृत्तवाहिन्यांवर अजिदादांचा विमान अपघातात मृत्यु अशा बातम्या सुरू झाल्या आणि सारा महाराष्ट्र सुन्न झाला.



**अजित पवार हा महाराष्ट्राच्या राजकारणातील लंबे रेस का घोडा होता, पण नियतीने त्यांच्यावर अचानक घाला घातला. अजितदादा म्हणजे शब्दाला पक्का, कामाला वाघ होता. त्यांच्या मृत्युने राजकारणातील एक झंजावात संपला.**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, प्रमोद म हाजन, गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख, आर. आर. पाटील यांच्या निधनानंतर असाच महाराष्ट्र अस्वस्थ झाला होता. अजित पवार हा लढवय्या नेता होता. त्यांचे काका शरद पवार यांचे बोट धरून ते सार्वजनिक जीवनात आले. पण त्यांनी आपल्या कामाने महाराष्ट्राच्या राजकारणात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांनी शरद पवारांच्या विरोधात जुलै २०२३ मधे बंडाचा झेंडा फडकवला, पक्षाचे चाळीस आमदार घेऊन ते भाजपप्रणित म हायुतीच्या छावणीत दाखल झाले. एकनाथ शिंदे यांच्या सरकारमधे उपमुख्यमंत्री झाले. राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्षाचे नाव व घड्याळ हे चिन्ह त्यांनी आपल्या पक्षाकडे घेण्यात यश मिळवले. शरद पवारांनी १९९९ मधे स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस या नावाचे दोन पक्ष झाले. काकांच्या पक्षाला तुतारी चिन्ह मिळाले. दोन पक्ष वेगळे, दोन चिन्ह वेगळी. पण पवार परिवारात कौटुंबिक संबंध सलोख्याचे राहिले. दरवर्षी दिवाळीत पवार परिवार बारामतीत एकत्र असतो. कौटुंबिक कार्यक्रमाला सारे पवार कुटुंबिय एकत्र दिसले. राजकारण वेगळे असले तरी कौटुंबिक नाते संबंध काका पुतण्यांनी टिकवून ठेवलेत.

अजित पवार हा महाराष्ट्राच्या राजकारणातील लंबे रेस का घोडा होता, पण नियतीने त्यांच्यावर अचानक घाला घातला. अजितदादा म्हणजे शब्दाला पक्का, कामाला वाघ होता. त्यांच्या मृत्युने राजकारणातील एक झंजावात संपला. प्रशासनावर त्यांची जबरदस्त पकड होती. दुसरीकडे सर्वसामान्य जनतेचे व कार्यकर्त्यांचे ते खऱ्या अर्थाने दादा होते. कार्यकर्त्यांसाठी वाट्टेल तेःअसा त्यांचा खाक्या होता. मात्र चुकीचे काम कोणी आणले तर ते होणार नाही, असे रोख ठोकपणे सांगणारा त्यांचा स्वभाव होता. लोकाभिमुख नेता कसा असावा याचे उदाहरण म्हणजे अजितदादा होते. दिलेला शब्द पाळणारा नेता होता. बारामती ते मंत्रालय असा त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला होता. म्हणूनच त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेताना, दादा परत या असा आक्रोश सामान्य जनतेकडून प्रकट झाला.

सन २००४ मधे झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे ७१ तर काँग्रेसचे ६९ आमदार निवडून आले होते. आपल्या पक्षाचे जास्त आमदार निवडून आले, म्हणून मुख्यमंत्रीपद राष्ट्रवादीला म्हणजेच आपल्याला मिळेल असे अजितदादांना वाटले होते. पण शरद पवारांनी मुख्यमंत्रीपद काँग्रेसला दिले व आपली संधी गेली, अशी भावना अजितदादांनी नंतर अनेकदा बोलून दाखवली होती.

सुप्रिया यांचा २००९ मधे राजकारणात प्रवेश झाला तेव्हाच अजितदादांना आता आपल्याला डावलले जाईल असे वाटू लागले होते. १९९९ ते २००९ या काळात ते सरकारमधे जलसंधारण मंत्री होते. त्याच काळात सत्तर हजार कोटींचा सिंचन घोटाळा झाल्याचे आरोप झाले. २०१४ च्या निवडणुकीत भाजपाने अजितदादांवर भ्रष्टाचारी म्हणून आरोप केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी चक्की पिसिंग .. पिसिंग असा फिल्मी डायलॉग मारला होता. तेव्हा आपली बदनामी करण्याचे षडयंत्र रचले गेले आहे, असे अजितदादांनी म्हटले होते. सहकार क्षेत्रातील साखर कारखाने कवडीमोल भावाने विकल्याच्या त्यांच्यावर आरोप झाला होता, ऑगस्ट २०२२ मधे मुंबई उच्च न्यायालयाने चौकशीचे आदेश दिले होते. नंतर ती फाईलच क्लोज झाली.

दोन मे , २०२२ रोजी शरद पवारांनी पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. तेव्हा, अजितदादांनी, नवीन चेहऱ्यांना सधी दिली जाईल असे म्हटले होते, पण चार दिवसातच शरद पवारांनी राजीनामा मागे घेतला. त्यानंतर अजितदादांनी बंडाचा झेंडा फडकविण्याचा निर्णय घेतला व एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील सरकारमधे सामील झाले. अजित पवारांनी शरद पवारांचा गळा घोटला , अशी टीका पवारांच्या निकटवर्तीयांनी त्यांच्यावर केली होती.

सहा वेळा उपमुख्यमंत्री व रेकॉर्डब्रेक अर्थमंत्री अशी अजित पवारांच्या नावापुढे नोंद राहिल. सुशीलकुमार शिंदे, विलासराव देशमुख, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस, उध्दव ठाकरे, एकनाथ शिंदे अशा मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीत ते सरकारमधे विविध खात्याचे मंत्री राहिले. मुख्यमंत्री बदलत राहिले पण अजितदादा उपमुख्यमंत्री नि अर्थमंत्री म्हणून कायम राहिले. मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न मात्र त्यांचे पूर्ण होऊ शकले नाही. अजितदादांचे नाव घेतले की त्यांनी देवेंद्र फडणवीसांबरोबर राजभवन ( आता लोकभवन ) वर पहाटेचा घेतलेला शपथविधी सर्वांना आठवतो. तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी फडणवीस यांना मुख्यमंत्री व अजित पवारांना उपमुख्यमंत्री म्हणून शपथ दिली होती.

विधानसभेची निवडणूक झाल्यानंतर दि. २२ नोव्हेंबर २०१९ रोजी नेहरू सेंटरला काँग्रेस, अविभाजित शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक चालू होती. या बैठकीला अजितदादा हातात एक फाईल घेऊन बसले होते. मधेच एक फोन आला म्हणून ते बाहेर गेले. दुसऱ्या दिवस उजाडला तो देवेंद्र व अजितदादांच्या शपथविधीच्या वृत्ताने सारा महाराष्ट्रात हादरला. हे सरकार पाच वर्षे चालेल असे योजले होते. तेव्हा अजितदादा म्हणाले- तीन पक्षांच्या ( काँग्रेस,शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस ) चर्चेला काही अंत नाही. एक महिन्यापासून चर्चा चालूच आहे, जी कुठे पोचणार नाही. राज्याला स्थिर सरकार हवे आहे म्हणून मी हे पाऊल उचलले.

२०१९ मधे अजितदादा भाजपा सोबत सरकार स्थापनेसाठी गेले, तेव्हा त्यांच्यावर घर फोडणारे म्हणून टीका झाली. त्यावर अजितदादांनी , आम्ही भाजपासोबत जाणार हे शरद पवारांना ठाऊक होते असे म्हटले :. पण शरद पवरारांच्या दबावामुळे अजितदादांबरोबर गेलेले बंडखोर आमदार परतले व पहाटे स्थापन झालेले सरकार ऐंशी तासात कोसळले.

सन २०२४ मधे झालेल्या लोकसभा निवडणुकीत बारामतीत सुप्रिया सुळेंच्या विरोधात अजित पवारांनी त्यांची पत्नी सुनेत्रा पवारांना उभे केले. सुप्रिया निवडून आल्या. भाजपाच्या सांगण्यावरून अजित पवारांनी सुनेत्रा पवारांना सुप्रिया विरोधात उभे केले अशी तेव्हा चर्चा झाली. नंतर अजित पवार यांनी म्हटले, बहिणीच्या विरोधात पत्नीला उभे करणे ही एक चूक होती.

अजित पवार हे भाजपबरोबर महायुती सरकारम धे सामील झाले तरी त्यांनी शरद पवारांशी संबंध तोडले नाहीत. अनेक सहकारी व शिक्षण संस्थांमधे काका- पुतण्या पदाधिकारी आहेत त्या निमित्ताने त्यांच्या नियमित भेटी गाठी होतच राहिल्या. भाजपासोबत जाऊनही ते भाजपाच्या आहारी गेले नाहीत. कधी जाती धर्माचे राजकारण केले नाही. कधी हिंदू- मुस्लिम मुद्दा उगाळला नाही. नागपूर येथे विधिमंडळाच्या अधिवेशन काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयात जाऊन आपण संघ व भाजपाचे किती जवळचे आहोत असे प्रदर्शन केले नाही.

सरकारमधे काही मनाविरूध्द घडले म्हणून वारंवार दिल्लीला धाव घेऊन मोदी- शहांकडे तक्रारी केल्या नाहीत. पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रावर पवार काका- पुतण्याचे विशेष प्रेम आहे. भाजपाची म क्तेदारी तोडल्याशिवाय आपले पुण्यावर वर्चस्व निम ाण होणार नाही याची अजितदादांना खात्री होती. पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने मिळून भाजपाच्या विरोधात लढवली.

जिल्हा परिषद निवडणूकही दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रपणे घड्याळ चिन्हावर लढवत आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसची विचारसरणी एकच आहे. निवडणूक काळात जेव्हा अजितदादांवरआरोप झाले तेव्हा ते म्हणाले- तुमच्या बापापेक्षा माझा काका मोठा आहे.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# अजित पवार राज्याचे 'खंबीर नेतृत्व', मराठवाड्याचा 'आधारवड' कोसळला!

## तखत श्री हजूर अबचलनगर साहिबजी गुरुद्वारातील उपमुख्यमंत्री अजित (दादा) पवार यांची 'ती' अखेरची भेट

प्रशासनावरील ज्यांची 'वचक', कामाचा 'उरक' पाहून अधिकारीही थक्क व्हायचे, असे संपूर्ण राज्याचे खंबीर नेतृत्व हरपले. अजित (दादा) पवार केवळ एका जिल्ह्याचे मर्यादित नेतृत्व नव्हते, तर ते राज्याचे उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन मंत्री आणि अल्पसंख्याक विकास मंत्री म्हणून राज्याचा गाडा समर्थपणे हाकत. ते राज्याचे नेते होतेच, पण त्याही पलीकडे जाऊन मराठवाडा विभागावर त्यांचा विशेष लोभ होता. दादा मूळचे पश्चिम महाराष्ट्राचे, पण धाराशिव त्यांचे सासर. त्यामुळे मराठवाड्याचे 'जावई' म्हणून त्यांचा या भागावर जीव होताच, पण बीड जिल्ह्याचे 'पालकमंत्री' म्हणून त्यांनी जिल्ह्याला पितृवत प्रेम दिले.

**पालकमंत्र्यांचा 'धडाका' आणि 'विक्रमी नोंद'** - बीडमध्ये त्यांनी विकासाचा विक्रम रचला होता. १ जानेवारी २०२६ ला वर्षाच्या पहिल्याच दिवशी त्यांनी बीडमध्ये एकाच वेळी १३६३ विकासकामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करून प्रशासनालाही अवाक केले होते.

केवळ इमारती नाहीत, तर निसर्गाशी नाते जोडत त्यांच्याच उपस्थितीत बीडमध्ये एकाच दिवशी ३० लाखांहून अधिक वृक्ष लागवड करण्यात आली. याची नोंद 'इंडिया रेकॉर्ड' मध्ये झाली. तरुणांवर त्यांचे विशेष प्रेम होते, म्हणूनच खेळाडूंसाठी क्रीडा विभागाचा २५ कोटींचा निधी मंजूर करून त्यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'टर्फ ग्राउंड' बीडकरांना दिले.

**सहकार आणि अर्थाची जोड**

प्रशासकीय शिस्तीचे भोक्ते असलेल्या दादांनी बीडमध्ये सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या विभागाच्या भव्य 'सहकार संकुला'चे भूमिपूजन केले. सर्व सहकारी कार्यालये एकाच छताखाली असावीत, हा त्यांचा आग्रह होता. राज्याचे वित्त व नियोजन मंत्री या नात्याने त्यांनी बीडच्या विकासाला कधीच निधी कमी पडू दिला नाही. १७ सप्टेंबर २०२५ ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'अहिल्यानगर-बीड' रेल्वेचे उद्घाटन झाले. या म हत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी २ हजार कोटींपेक्षा जास्त निधी आणि ऐनवेळी दिलेले १५० कोटी रुपये, ही अर्थमंत्री म्हणून दादांनीच मंजूर केले होते.

**हृदयाची काळजी घेणारे 'दादा'**

बीड जिल्हा रुग्णालयात 'कार्डियाक कॅथलॅब' देऊन त्यांनी गोरगरिबांच्या हृदयाची सोय केली. दुर्दैवाने, बीडकरांच्या हृदयाची काळजी घेणाऱ्या पालकमंत्र्यांचे हृदय मात्र आज थांबले.

एकीकडे राज्याच्या अर्थव्यवस्थेचे सुकाणू सम र्थपणे सांभाळणारे 'वित्त व नियोजन मंत्री' आणि दुसरीकडे बीडच्या प्रत्येक प्रश्नावर बारकाईने लक्ष घालणारे 'पालकमंत्री'... अशी दुहेरी भूमिका त्यांनी समर्थपणे पेलली. धाराशिवचे जावई आणि बीडचे पालक असलेल्या या विकासपुरुषाला भावपूर्ण श्रद्धांजली!

**- डॉ. श्याम टरके**
सहायक संचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय, लातूर.



अवघ्या दोन दिवसांपूर्वी, २५ जानेवारीला दादा मराठवाडा विभागाच्या दौऱ्यावर, नांदेडच्या पवित्र भूमीत होते. नांदेड येथील 'तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब' गुरुद्वारात ते नतमस्तक झाले. सुरुवातीला उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी पवित्र गुरुद्वारात अत्यंत भक्तीभावाने दर्शन घेतले. 'कडा प्रसाद' ग्रहण केला. यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर समाधान होते.

दर्शन झाल्यानंतर ते गुरुद्वारा परिसरात थांबले. 'तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब'जींचे दर्शन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेऊन, बाहेर येईपर्यंत दादा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वाट पाहत होते. त्यानंतर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व इतर सर्व मंत्री महोदय यांनी पवित्र गुरुद्वारातून एकत्रितपणे ऐतिहासिक 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शताब्दी समागम कार्यक्रमासाठी मोदी मैदानाकडे प्रस्थान केले. राज्याचे नेतृत्व म्हणून ज्येष्ठता आणि पदाचा मान राखण्याची त्यांची ही कृती सर्वांनाच भावली. गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ जी यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि उपस्थित सर्व मान्यवरांचा यावेळी सन्मान केला.

# हुतात्मा दिनी हुतात्म्यांचे स्मरण करू या

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अनेक वीरांनी,शुरानी, राष्ट्रभक्तांनी भारतमातेच्या मुक्ततेसाठी आपल्या प्राणांची आहुती वाहिली.१८५७ते १९४७या या नव्वद वर्षाच्या काळात भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी क्रांतिकारकानी, शूरवीरांनी, देशभक्तांनी जो लढा देऊन काही वीर हुतात्मा झाले पण जुलमी ब्रिटिश सरकारला देशातून घालवून लावले अशा त्या हौतातम्यांच्या कार्याला जगात तोड नाही. अशा या महान क्रांतिकारक व शूर वीरांचे स्मरण करणे ,त्यांना आदरांजली अर्पण करणे, त्यांच्या राष्ट्रीय कर्तव्याची उजळणी व कार्याची माहिती नव्या पिढीला करून देऊन त्यांच्या स्मृतींना मानवंदना देणे हे प्रत्येक भारतीयांचे आद्य कर्तव्य होय.

अगदी कोवळ्या वयातील मुले ते ८०-९० वर्षापर्यंतच्या नागरिकांनी या स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेऊन भारत मातेच्या मुक्ततेसाठी प्राणांची आहुती दिली अशा थोर हुतात्म्यांना अभिवादन करणे हे सर्व भारतीयांचे कर्तव्य होय,१८५७ ते १९४७ ह्या नव्वद वर्षाच्या काळातील भारत मातेच्या मुक्ततेसाठीचे लढे देशाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिलेले आहेत.

३०जानेवारी,१९४८ रोजी भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे अहिंसेच्या मार्गाने लढा दिलेले राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना ही देशाचा निरोप घ्यावा लागला.म्हणून दरवर्षी ३०जानेवारी हा दिन संपूर्ण देशात हुतात्मा दिन म्हणून म्हणून पाळला जातो .या दिनी सकाळी अकरा वाजता देशातील सर्व व्यवहार दोन मिनिटांसाठी थांबवून या सर्व हुतात्म्यांना शांत उभे राहून आदरांजली अर्पण केल्या जाते.या सर्व हुतात्म्यांची स्वातंत्र्य लढ्यातील कामगिरी ,त्यांचा सहभाग व त्यांचे हौतात्म्य या सर्व बाबी आठवून त्यांना आदरांजली अर्पण करतात.या थोर क्रांतिकारकानी देशाला.

देशाला मिळवून दिलेले स्वातंत्र्य आम्हा सर्व भारतीयांना टिकवून ठेऊन देशाच्या अस्मितेचे रक्षण व देशाच्या उन्नती व विकासासाठी कटिबद्ध राहावयाचे आहे.या सर्व हुतात्म्यांना मानाची मानवंदना .जय हिंद,जय भारत.

**- धोंडीरामसिंह ध राजपूत,वैजापूर संभाजीनगर.**

# 'स्वीकृत नगरसेवक पद सामाजिक पातळीवर काम करणाऱ्यांना देण्यात यावे'

**मागील** अनेक वर्षापासून स्वीकृत सदस्य म्हणून त्या-त्या पक्षातील राजकीय लोकांना विशेष स्थान दिल्या जाते. परंतु बदलत्या काळानुसार स्वीकृत सदस्य पदाचे निकष बदलविने गरजेचे आहे. सन्माननीय मुख्यमंत्री महोदय, संपूर्ण महाराष्ट्रात भाजपा सोबतच महायुतीला महानगरपालिका निवडणुकीमध्ये भरघोस यश प्राप्त झाले आणि २९ पैकी २५ मनपामध्ये जनतेचा कौल महायुतीकडे आला व महायुतीची सत्ता आली आहे याबद्दल आपले, भाजपाचे व महायुतीचे हार्दिक अभिनंदन.

या सर्वच महापालिकेमध्ये १५ नगरसेवकांच्या मागे १ नगरसेवक अशा पध्दतीने स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती होणार आहे याचेही मनापासून स्वागत. स्वीकृत नगरसेवक निवडण्याचा अधिकार त्यांच्या संख्याबळाप्रमाणे प्रत्येक राजकीय पक्षांना आहे. आतापर्यंत स्वीकृत नगरसेवक हा राजकीय पातळीवरील असायचा. परंतु सरकारने स्वीकृत नगरसेवक पदाचे निकष बदलवून राजकीय पातळीवर न देता सामाजिक पातळीवर द्यायला हवे असे मला वाटते.प्रत्येक महानगरपालिकेच्या अंतर्गत सामाजिक कार्यशैलीला कुठेतरी मानाचे स्थान असणे गरजेचे आहे. सामाजिक कार्य करणारे निष्ठावंत,विचारवंत व समाजासाठी झटणारे वेगवेगळ्या क्षेत्रातील समाजसेवक सुद्धा असतात आणि आहेत त्यांचे कार्य अफाट असते परंतु दिसत नाही,ही बाब सरकारने व राजकीय पक्षांनी लक्षात घेतली पाहिजे. सोबतच प्रत्येक पक्षांच्या राजकीय पुढाऱ्यांनी सुद्धा लक्षात ठेवली पाहिजे.यात प्रामुख्याने पत्रकार, लेखक, साहित्यिक, स्वतंत्र पत्रकार, विचारवंत,पर्यावरण प्रेमी,निवृत्त अग्निशमन अधिकारी, सैन्यदलातील निवृत्त अधिकारी, निसर्ग प्रेमी इत्यादी अशा अनेक प्रकारच्या सतत सामाजिक कार्यासाठी झटणाऱ्यांना स्वीकृत सदस्यपदी स्थान मिळायला हवे. कारण राजकारणाच्या ठिकाणी राजकारण ठीक आहे. परंतु सामाजिक कार्याला नवी चालना देण्याच्या उद्देशाने सरकारने व पक्ष-विपक्षांनी अशा पध्दतीचे पाऊल उचलले पाहिजे. कारण स्वीकृत सदस्य हा पर्याय सरकार जवळ असल्याने याला राजकारणात गुरफटने योग्य नाही. यावर सरकारने, सन्माननीय राज्यपाल,सन्माननीय मुख्यमंत्री, सन्माननीय उपमुख्यमंत्री यांनी गांभीर्याने विचार करून सामाजिक कार्याला नवीन दिशा देण्याच्या उद्देशाने पाऊल उचलणे गरजेचे आहे.आज पत्रकार, लेखक आपल्या लेखणीच्या माध्यमातून गल्लीपासून तर आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंतची माहिती प्रत्येकांच्या घरोघरी पोहचविण्याचे कार्य करीत असतो. अशांना सरकारने स्वीकृत नगरसेवकांची जबाबदारी दिली तर सामाजिक कार्याला मोठी मदत होईल. राजकीय पुढारी हा आपल्या पद्धतीने कार्य करेलच यात दुमत नाही. परंतु सामाजिक क्षेत्रातील समाजसेवक हे आपले कार्य आगळ्यावेगळ्या पद्धतीने करून नवीन विकासाचे पाऊल उभे करू शकते व नवीन ऊर्जा निर्माण करू शकते. कारण सामाजिक कार्याची जाणीव व दांडगा अनुभव यांना पुर्वीपासूनच असतो फक्त साथ हवी सरकारची,राजकीय पक्षांची व पुढाऱ्यांची.त्यामुळे सरकारने राजकीय ताळमेळासोबतच सामाजिक कार्याची बांधिलकी जपणाऱ्यांना जर सरकारने स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती केली तर शहराच्या विकास आणखी भरभराटीला येईल.सरकारला व सन्माननीय मुख्यमंत्री यांना माझी नम्र विनंती आहे की स्वीकृत नगरसेवकांच्या बाबतीत गांभीर्याने विचार करायला हवा. कारण राज्यातील महापालिकांमध्ये जर सामाजिक कार्यातील व्यक्ती सहभागी झाली तर राज्यातील चित्र आगळेवेगळे दिसून येईल. कारण यामध्ये येणारे स्वीकृत नगरसेवक वेगवेगळ्या क्षेत्रातील असल्याने वेगवेगळ्या विषयांच्या माध्यमातून मनपामध्ये नवीन ऊर्जा निर्माण करण्याचे काम करतील.कारण त्यांचा अनुभव व अभ्यास शहराच्या विकासासाठी हातभार अवश्य लावेल. स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती सामाजिक पातळीवर केली तर राज्याचे नाव देशामध्ये सुवर्ण अक्षरात कोरले जाईल. यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी, सरकारनी व माननीय मुख्यमंत्री महोदयांनी एकमत करून ताबडतोब निर्णय घेतला पाहिजे. जेणेकरून सामाजिक कार्याला नवीन चालना मिळेल.जय हिंद. जय महाराष्ट्र.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# मुंबईत कुस्तीचा महासंग्राम; 'नरसिंह यादव दंगल लीग'चे चॅम्पियनपद महाराष्ट्राकडे



मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) - अर्जुन पुरस्कार विजेते व ऑलिम्पियन श्री. नरसिंह यादव (पोलीस उपायुक्त, मुंबई) यांच्या संकल्पनेतून आणि नरसिंह फाउंडेशन तसेच नागरिक संरक्षण दल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नरसिंह यादव दंगल लीग' स्पर्धेत महाराष्ट्र संघाने विजयी झेंडा फडकावला.

श्री. विलासराव देशमुख मैदान, लोखंडवाला, कांदिवली (पूर्व), मुंबई येथे झालेल्या या एकदिवसीय कुस्ती लीगमध्ये महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि पंजाब या देशातील चार बलाढ्य कुस्ती राज्यांचे संघ सहभागी झाले होते. प्रत्येक संघातून ५ पुरुष व २ महिला अशा एकूण ७ खेळाडूंनी सहभाग घेतला असून, स्पर्धेत एकूण २८ कुस्तीपटूंनी आपली ताकद आजमावली.

स्पर्धेची सुरुवात हरियाणा व पंजाब यांच्यातील चुरशीच्या सामन्याने झाली. या लढतीत हरियाणाच्या ५ कुस्तीपटूंनी विजय मिळवला, तर पंजाबच्या २ कुस्तीपटूंनी बाजी मारली. परिणामी पहिला सामना हरियाणा संघाने जिंकला. दुसऱ्या सामन्यात उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र यांच्यात रंगतदार सामना झाला. महाराष्ट्राच्या ४ कुस्तीपटूंनी विजय मिळवत संघाला आघाडी मिळवून दिली, तर उत्तर प्रदेशच्या ३ कुस्तीपटूंनी विजय मिळवला. या सामन्यात महाराष्ट्र संघ विजयी ठरला.

अंतिम सामन्यात महाराष्ट्र आणि हरियाणा आमनेसामने आले. महाराष्ट्राच्या पृथ्वीराज पाटील, रविराज चव्हाण, आदर्श पाटील, अमृता पूजारी आणि सोनाली मंडलिक या पाच कुस्तीपटूंनी शानदार विजय मिळवला, तर हरियाणाच्या अंकुश सागर दहिया आणि कुसुम दहिया यांनी आपापले सामने जिंकले. अंतिम फेरीत महाराष्ट्रने ५-२ असा विजय मिळवत 'नरसिंह यादव दंगल लीग'चे चॅम्पियनपद पटकावले.

या स्पर्धेसाठी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, मीरा-भाईंदर पोलीस आयुक्त निकेत कौशिक, आमदार अतुल भातळखर, आमदार संजय उपाध्याय, दुबईतील उद्योगपती काझी अब्दुल मतीन, संपत साळुंखे, माजी खासदार गोपाळ शेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती. बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेते मुकेश ऋषी यांनी प्रेक्षकांशी साधलेल्या संवादामुळे मैदानात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी बोलताना आयोजक श्री. नरसिंह यादव म्हणाले, ङ्गदेशातील कुस्तीला नवसंजीवनी देण्यासाठी अशा लीग स्पर्धा अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. या माध्यमातून अनेक नवोदित कुस्तीपटू घडतील. मुंबई व परिसरातील प्रेक्षकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल मी मनापासून आभारी आहे. स्पर्धेतील विजेत्यांवर लाखो रुपयांच्या बक्षीसांचा वर्षाव करण्यात आला.

विजेत्या महाराष्ट्र संघाला आयोजक नरसिंह यादव आणि डॉ. शिल्पी शेरॉन-यादव यांच्या हस्ते चांदीची गदा आणि 'नरसिंह यादव दंगल लीग' ची मानाची ट्रॉफी प्रदान करण्यात आली. ही स्पर्धा कुस्तीप्रेमींसाठी अत्यंत रोमांचक ठरली.

सर्व संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले आणि संघबळाच्या जोरावर महाराष्ट्राने चॅम्पियनपदावर आपले नाव कोरले.

# श्रीकृष्णांचा आनंददायी काला आपण दररोज अनुभवू शकतो - ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड



छत्रपती संभाजीनगर, दि. ३० (प्रतिनिधी) - श्रीकृष्णाप्रमाणे आनंदाचा काला आपणाला दररोज घेता यऊ शकतो, त्यासाठी कुटुंबातील सर्व सदस्यांनी कीमान दिवसातून एकदा तरी म्हणजे किमान रात्री तरी एकत्र बसून शांत चित्ताने जेवण करावे. भगवंत आपल्यासोबत जेवत आहे, अशी भावना जोपासून अन्न ग्रहण करणे म्हणजे आनंदाचा कालाच होय, असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले.

छत्रपती संभाजीनगर येथील काबरानगर येथे दरवर्षीप्रमाणे धार्मीक उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशीचे काल्याच्या कीर्तन सेवेचे पुष्प गुंफतांना ज्ञानदास डॉ. फड यांनी मानवी जीवनाची सर्वांगानी महती स्पष्ट केली. श्रीकृष्णांनी कर्तव्य व जबाबदारीवर तसेच मित्रपरीवार व पाहुणे मंडळी यांच्या चांगले संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला. आपणही श्रीकृष्णांच्या जीवनातील चांगल्या वाटतील तेवढया तरी बाबी आचरणात आणल्या पाहीजेत. कर्तव्य हाच भक्तीचा व मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे. आपली कर्तव्य नीतिनियमाला अनुसरून पार पाडली तरी जीवनातील व समाजातील बरेच प्रश्न मिटू शकतात. अंतर्बाह्य स्वच्छता, वृक्षारोपण, स्त्रीयांचा मान सन्मान, वडीलधाऱ्यांची सेवा, गरजूंना मदत अशा बाबींवर संतांनी भर दिला आहे. संतांचे हे विचार ज्यांना जीवनात अवलंबिता येतात त्यांना भक्ती म्हणून वेगळे काही करण्याची गरज पडत नाही. सदाचार, सद्विचार, मानवता, कर्तव्य, जबाबदारी, प्रेम आदीचा काला तयार सदैव स्वीकार कारावा असे म्हटले. लेक आणि सून यामध्ये फरक करणे, सुनेचा छळ करणे, स्त्रीयांकडे वाईट नजरेने पाहणे, मुलगी आणि मुलगा यांत फरक करणे, अस्वच्छ राहणे, सासू सासऱ्यांची अवहेलना करणे या बाबी सुध्दा पापाचा भाग असल्याचे त्यांनी काही ओव्या, अभंग व श्लोकांच्या आधारे पटवून दिले. श्री ज्ञानेश्वरीतील अनके दाखले त्यांनी यावेळी दिले.

फड यांनी सत्कार व मानधनास नकार दिल्याने वडिलधा-या मंडळींनी याबाबत आनंद व्यक्त केला. काल्याचे कीर्तन असेच व्हायला पाहिजे असे संयोजकांनी आभार मानतांना म्हटले.

# संभाजीनगर शहरातील अर्चक पुरोहित यांच्यासाठी ३१ जानेवारीला मोफत आरोग्य तपासणी शिबिर

## वि.हिं.प.मंदिर अर्चक पुरोहित आयाम अ.भा. पुरोहित महासंघ व जे जे प्लस हॉस्पिटल यांचा स्तुत्य उपक्रम

छत्रपती संभाजीनगर, दि. ३० (प्रतिनिधी) - पुजारी हा केवळ कर्मचारी नसून तो देवालयाचा प्राण असतो. असे म्हणतात की 'अर्चकस्य प्रभावेन शिला भवति शंकर:!' अर्थात पुजाऱ्याच्या पुरोहितांच्या पूजेतील श्रेष्ठ भावनेमुळे पाषाणाला देवत्व येते. मंदिरे आणि देवांशी भाविकांचे नाते जोडणारे अर्चक पुरोहित यांचे हिंदू संस्कृतीमध्ये फार मोठे महत्त्वाचे स्थान आहे.

एका विशिष्ट हेतूने आमच्या ऋषीमुनींनी आर्चक पुरोहित या दोन सामाजिक रचनांची निर्मिती केली आणि त्यांनी ती आत्तापर्यंत प्रभावीपणे निभावली त्यामुळेच आजपर्यंत हिंदुत्वाचा प्रवाह सहज अखंड प्रवाहित राहिला आहे आणि पुढे ही राहणार आहे.

हिंदू संस्कृतीचे जतन करणाऱ्या अर्चक पुरोहितांचे आरोग्य उत्तम रहायला हवे ही बाब लक्षात घेऊन विश्व हिंदू परिषदेचा मंदिर अर्चक पुरोहित आयाम अखिल भारतीय पुरोहित महासंघ आणि जे जे प्लस हॉस्पिटल छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने संभाजीनगर शहरात राहणाऱ्या पुरुष आणि महिला अर्चक पुरोहित यांच्यासाठी शनिवार दिनांक ३१ जानेवारी २०२६ सकाळी ९ ते २ या वेळात जिल्हा न्यायालया समोरील जे जे प्लस हॉस्पिटल मध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये १) बीपी २) रँडम शुगर ३)डोळे तपासणी ४) कान नाक घसा तपासणी ५) इसीजी ६) आरबीसी ७) बी एम आय या तपासण्या करण्यात येणार आहेत. या तपासण्यानंतर येणाऱ्या रिपोर्टच्या आधारावर जे जे प्लस हॉस्पिटल मधील तज्ञ डॉक्टर प्रत्येकाला वैयक्तिक मार्गदर्शन करणार आहेत.

ज्या अर्चक पुरोहितांना या मोफत आरोग्य तपासणी शिबिरात भाग घ्यायचा आहे त्यांनी खालील संपर्क क्रमांकावर फोन करून नोंदणी करावी असे आवाहन

मंदिर आयामाचे चिकलठाणा भाग प्रमुख शिवाजी दहिवाल खडकी भाग प्रमुख प्रदीप देशमुख अखिल भारतीय पुरोहित महासंघाचे वे.शा.सं. विनायक फुलंब्रीकर वे.शा.सं. विश्वंभर जोशी तसेच जे जे प्लस हॉस्पिटलचे डॉ. जीवन राजपूत यांनी केले आहे

संभाजीनगर शहरातील आर्चक पुरोहित यांनी मोफत आरोग्य तपासणीच्या दृष्टिकोनातून खालील क्रमांकावर आपले नाव नोंदवावे वे.शा. सं. पद्मनाभ चौधरी गुरुजी ९८९०१८२८८५ श्री. हरिनारायण ( जे जे प्लस हॉस्पिटल ) ९११२२२१६५४ श्री शिवाजी दहिवाल ९४२२२९०२७५.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलात १५ अत्याधुनिक वाहनांची भर; आयुक्त जी. श्रीकांत यांच्या हस्ते लोकार्पण




छत्रपती संभाजीनगर, दि. ३० (प्रतिनिधी) - शहरातील अग्निशमन यंत्रणेचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलात सुमारे २४ कोटी रुपये खर्चून १५ अत्याधुनिक अग्निशमन वाहने दाखल करण्यात आली आहेत. या नव्या वाहनांचा लोकार्पण सोहळा मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडे असलेली काही जुनी वाहने कालबाह्य झाल्याने आपत्कालीन परिस्थितीत अडचणी येत होत्या. ही गैरसोय टाळून शहरवासीयांना अधिक जलद आणि प्रभावी सेवा देता यावी, यासाठी ही नवीन वाहने खरेदी करण्यात आली आहेत.

या टाप्प्यात ८,५०० लिटर क्षमतेचे २ मोठे फायर टेंडर्स, ५,५०० लिटर क्षमतेचे ६ फायर टेंडर्स आणि २,००० लिटर क्षमतेचे २ फायर टेंडर्स यांचा समविश आहे. यासोबतच फोम टेंडर्स, रेस्क्यू व्हॅन आणि क्विक रिस्पॉन्स व्हॅन देखील दाखल करण्यात आल्या आहेत. सर्व वाहनांमध्ये फोम प्रणाली, प्रथमोपचार किट, जॅक यांसारख्या आधुनिक सुविधा उपलब्ध असून, औद्योगिक भाग, उंच इमारती, अरुंद रस्ते तसेच रासायनिक व विद्युत आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी ही वाहने अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. या नव्या वाहनांमुळे शहरात आग, आपत्ती व अन्य आपत्कालीन परिस्थितीत वेगवान प्रतिसाद देणे शक्य होणार असून नुकसान कमी करण्यास मोठी मदत होणार आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी महानगरपालिका कटिबद्ध असून, भविष्यातही अग्निशमन दलाच्या क्षमतेत आणखी वाढ करण्यात येणार असल्याचे यावेळी आयुक्त जी. श्रीकांत यांनी सांगितले. या लोकार्पणामुळे छत्रपती संभाजीनगरच्या अग्निशमन दलाला नवे बळ मिळाले असून, शहराच्या आपत्ती व्यवस्थापनात हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. याप्रसंगी महानगरपालिकेतील काही अधिकारी तसेच अग्निशमन दलातील (मुख्य अग्निशमन अधिकारी) श्री अशोक खांडेकर (अग्निशमन केंद्र अधिकारी - श्री विजय राठोड, अग्निशमन केंद्र अधिकारी श्री विनायक कदम यांच्यासह ड्युटी ऑफिसर हरिश्चन्द्र पवार, रमेश सोनवणे, हरिभाऊ घुगे, लक्ष्मन कोल्हे, वैभव बाकडे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी वाहन चालक आदींची उपस्थिती होती.

# जैन शाळेतुन संस्कार, शिस्त आणि राष्ट्रभक्ती यांचे बीजारोपण विद्यार्थ्यामध्ये केले जाते- कुशल पाटनी



छत्रपती संभाजीनगर, दि. ३० (प्रतिनिधी) - पी. यु. जैन विद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त कुशल सुभाषचंद पाटनी आणि श्रीमती शोभा पाटनी यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. प्रमुख अतिथी म्हणून जैन टॅग च्या उपाध्यक्ष सौ. उज्वला नवीनजी पाटनी, जैन शिक्षण संस्थेच्या सचिव सौ. आशादेवी देवेंद्रजी काला यांची उपस्थिती होती. जैन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष महावीरजी सेठी कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. ४थी च्या विद्यार्थ्यांनी मंगलाचरण गीत सादर करुन प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संस्था अध्यक्ष महावीर सेठी यांनी प्रास्ताविकातून शाळेच्या प्रगतिविषयी, नवीन योजनविषयी माहिती दिली. डॉ. होमी भाभा वैज्ञानिक परीक्षेत समर्थ विजय सुपेकर, भूगोल प्रज्ञाशोध परिक्षेत सुवर्णपदक प्राप्त करणाऱ्या अनन्या नितीन गांगवे, रामकृष्ण मिशन आश्रम उतारा पाठांतर स्पर्धेत तिसरा क्रमांक प्राप्त पुनम गवळी,तर ललित कला महोत्सव विभागीय स्तरावर द्वितीय पारितोषिक मिळवणारा समक्ष पिठोरे या विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. क्षितिजा महाले आणि पूनम गवळी यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त भाषण सादर केले. बालवाड़ीच्या विद्यार्थ्यांनी ओम साई राम, स्वर्गात आकाशगंगा, संदेशे आते है गितावर नृत्य सादर केले. १ली २री च्या विद्यार्थ्यांनी फिर भी दिल है हिंदुस्तानी, ही मायभूमी ही जन्मभूमि या गितावर कवायत सादर केली. लेझिम कवायत, डंबेल्स, रिंग कवायत, घुंगरू काठी, भारुड संगीतमय कवायतीचे सादरिकरण केले. धनसिंगजी शेरे यांनी ऐ मेरे वतन के लोगो या गितावर बासरिवादन केले. शाळेतुन संस्कार, शिस्त आणि राष्ट्रभक्ती यांचे बीजारोपण विद्यार्थ्यामध्ये केले जाते हे प्रशंसनीय आहे असे ध्वजारोहक कुशलजी पाटनी यांनी सांगितले, तर प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात शेतकरी, सैनिक ,शिक्षक, आई-वडील आणि परमेश्वर यांचे महत्व असल्याने दररोज मुख्य अतिथि उज्वलाजी पाटनी यांनी सांगितले. महावीरजी सेठी यांच्या सामाजिक व धार्मिक कार्याची दखल घेत यांची बिनविरोधपने भारतवर्षीय दिगम्बर जैन महासभा राष्ट्रीय कार्यकारिणीत निवड, सुनीलजी सेठी यांची जैन इंजीनियर्स सोसायटी वेस्ट झोनच्या सेक्रेटरी पदावर निवड तर सौ. श्वेता राजेशजी कासलीवाल यांनी संभाजीनगर ते कुन्थलगिरी हे १८५ किमी चे अंतर सायकल वर पार केल्यामुळे यांचा शालेतर्फे सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक दीपा छाबडा, श्रुती काला, रुचिता ठोले, शीतल ठोले, सुजाता मदने या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी जैन शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष सुनीलजी सेठी, सहसचिव सुनीलजी अजमेरा, कोषाध्यक्ष डॉ. रमेशजी बडजाते, कार्यकारिणी सदस्य कमलजी पहाडे, राजेशजी कासलीवाल, सावनजी चूडिवाल, सुचेताजी सेठी, मीनाजी सेठी, देवेंद्रजी काला, राजकुमारजी पांडे सुवर्णा शहा, उषा पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश छाबडा, कल्पना अजमेरा यांनी केले तर आभार मुख्याध्यापिका कविता ठोळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका कविता ठोले, जीवन सावजी, नीलेश छाबडा, मयूर लोहाडे, मयूर गंगवाल, कल्पना अजमेरा, सुनंदा संगवे, राखी बाकलीवाल, प्रियंका चुडीवाल, ज्योती बाकलीवाल, नीलेश अजमेरा यांनी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

